सकाळ TODAY पुणे गुरूवार ३ फेब्रुवारी २०११

# ते तरुणांना वाटताहेत 'प्रकाश'

## रोजगार संधींची माहिती देण्यासाठी ३५ वर्षांपासून भ्रमंती

वसुधा जोशी : सकाळ वृत्तसेवा



सतीश फिरके

पुणे, ता. २ : रोजगाराच्या संधी चाचपडत चाचपडत कधी कधी आयुष्यही सरते. पण, योग्य वयात करिअर मार्गदर्शन मिळाले तर आयुष्य सुंदर होऊ शकते. त्यामुळेच रोजगाराच्या विविध संधींची माहिती देण्यासाठी सतीश फिरके गेली ३५ वर्षे गावोगावी भ्रमण करत आहेत. स्वतःचे अंधत्व विसरून तरुणांना वाट दाखवत आहेत. युवकांबरोबरच पालकांनाही करिअरच्या विविध संधींची माहिती व्हावी, यासाठी त्यांनी रोजगार साक्षरता अभियान सुरू केले आहे. त्यामध्ये त्यांना रमेश बेंद्रे यांची साथ मिळत आहे.

**विधायक**

ग्रामीण भागात वास्तव्य झाल्यामुळे तिथली बेरोजगारी फिरके यांनी अनुभवली. व्यावसायिक दृष्टिकोन नसल्याने होणारी उपासमारी पाहिली. त्यामुळे लोकांमध्ये हा दृष्टिकोन निर्माण होण्यासाठी आयुष्याची ५-१० वर्षे देण्याचे ठरवले. पण, प्रश्नाचे गांभीर्य बघून संपूर्ण आयुष्यच या प्रश्नासाठी वेचले. फिरके म्हणाले, "राज्यातील प्रत्येक तालुक्यात सुमारे २५-३० हजार बेरोजगार आढळतात. पण, रोजगार संधींची माहिती दिल्यास हे प्रमाण नक्कीच कमी होईल. जळगाव जिल्ह्यातील पारोळा तालुक्यातील १६, तर धुळे जिल्ह्यातील आठ गावांचा अभ्यास केला. त्या वेळी ग्रामीण भागात फळे व भाज्या प्रक्रिया केंद्रे, तेलबिया उत्पादन, ग्राम आरोग्य केंद्र आदी स्वरूपाचे २७ प्रकारचे रोजगार उपलब्ध होऊ शकतात हे लक्षात आले. तर सुमारे १५२ प्रकारच्या रोजगार संधी आहेत. पान ३ वर »

## ते वाटताहेत 'प्रकाश'

» पान १ वरून

पण, हे सांगणारी यंत्रणा प्रत्येक गावात उभे करणे गरजेचे आहे. कॉल सेंटरमध्ये मिळणाऱ्या पैशामुळे युवक तिथे रात्रं-दिवस काम करतात. तशा प्रकारच्या प्रेरणा या व्यवसायातही निर्माण झाल्या पाहिजेत. विविध प्रकारच्या करिअरची माहिती करून घेण्यासाठी लोकांनी स्वतःच पुढाकार घेतला पाहिजे."

रोजगार साक्षरता अभियानाबद्दल ते म्हणाले, "पालकांनाच रोजगार संधीबद्दल फारशी माहिती नसते. त्यामुळे त्यांच्यात जागरूकता निर्माण करण्याची अधिक गरज आहे. त्यासाठी ४०० तालुक्यांत जनजागरण मेळावे घ्यायचे आहेत. रोजगार संधीविषयी मी लिहिलेले 'वे टु ब्राईट फ्युचर' हे पुस्तक मराठीत आणायचे आहे. लोकांच्या मदतीनेच हे काम पुढे जाईल."

बेंद्रे म्हणाले, "स्वतःच्या आवडीपेक्षा मित्र-मैत्रिणी जे क्षेत्र निवडतात, तेच बहुतांश मुले निवडतात. संधींची माहिती देण्याबरोबरच आम्ही कल चाचणीही घेतो. त्यामध्ये पालकांचाही सहभाग घेतो."

# MAHARASHTRA STATE FEDERATION OF PRINCIPAL'S ASSOCIATION OF NON-GOVERNMENT COLLEGES

Reg. No. MAH/63331-91, Pune (Soc. Reg. Act.) & 1950 F-7259 (Public Trust Act)

## The State Level Apex Forum of Principals of Non-Government Colleges

President
**Nandkumar Nikam**
Principal
C.T. Bora College,
Shirur Ghodnadi, Dist. Pune.
☎ (O) (02138) 224170, 222498
222301, 222669
(R) (02138) 222214
Mobile - 9822307399

General Secretary
**Anil Rao**
Principal
M.J. College, Jalgaon.
☎ (O) (0257) 2237874, 2234281
Fax : 2237363
(R) 2250310
Mobile - 9823058391

Treasurer
**Dr. Krantikumar Patil**
Principal
Kamala College,
Rajarampuri, Kolhapur - 1
☎ (O) (0231) 2522216
(R) 2524524

Joint Secretary
**Suresh alias Jeevan Deshmukh**
N. A. Deshmukh College
Chandurbazar, Dist. Amravati
☎ (O) (07227) 243375
(R) (0721) 2531449

Convenor
**Dr. Sharad Advant**
Mayur Complex, 3rd floor
opp. Bhaji Mandai, Aurangpura
Aurangabad 431 001.
☎ (R) 2332193

Registered Office
**Marathwada Mitra Mandal's**
**College of Commerce**
302/A Deccan Gymkhana,
Pune 411 004
☎ (O) (020) 5653039, 5651410
(R) 4266276

जा.क्र. ३६३३/०१-[illegible]
दि.२.९.२००९

मा.प्राचार्य,

श्री.सतिश फिरके एक अभ्यासू व अंशतः अंध व्यक्ती आहेत. त्यांनी समाजसेवेच्या बांधिलकीमधून विविध विषयांवर संशोधन करुन पुस्तके लिहिली आहेत. तसेच विशेषतः महाविद्यालयीन तरुणांच्या सर्वांगीण विकासाबाबत तसेच शिक्षीत तरुणांच्या नोकरी, व्यवसाय व अन्य उत्पन्नाचे मार्ग याबाबत अत्यंत अभ्यासू पध्दतीने काम करुन सामान्यांना सहज उपलब्ध न होणारी माहीती त्यांनी आपल्या "Way to Bright Future" या तीन खंडात प्रकाशीत केलेल्या पुस्तकात दिलेली आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना ही माहीती खूपच उपयुक्त आहे. याशिवाय श्री.फिरके या विषयावर विद्यार्थ्यांशी उत्तम पध्दतीने संवादही साधत असतात.

आपणास विनंती की, आपल्या महाविद्यालयाच्या सोयीने श्री.सतिश फिरके यांना विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याची संधी द्यावी तसेच त्यांनी लिहिलेले अत्यंत उपयुक्त असे "Way to Bright Future" आपल्या ग्रंथालयासाठी शक्य असल्यास घ्यावे ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,
२/९/०९
नंदकुमार निकम
प्राचार्य
अध्यक्ष प्राचार्य महासंघ